सकाळ



भादवण : रवळनाथ सोसायटीतर्फे कंबुबाई खुळे यांना आर्थिक मदत देताना मीना रिंगणे, उमा तोरगल्ली. शेजारी एम. एल. चौगुले, डॉ. दत्ता पाटील, महेश मजती, संदीप कागवाडे आदी.

# भादवणच्या जळीतग्रस्त महिलेस 'रवळनाथ'चा आर्थिक आधार

गडहिंग्लज, ता. ७ : भादवण (ता. आजरा) येथील कंबुबाई खुळे यांच्या घराला लागलेल्या आगीत संसारोपयोगी साहित्याचे मोठे नुकसान झाले. या जळीतग्रस्त महिलेला येथील रवळनाथ हाउसिंग फायनान्स सोसायटीने आर्थिक मदतीचा आधार दिला. संस्थेतर्फे १५ हजार रुपये देण्यात आले.

रवळनाथ सोसायटीतर्फे समाजातील गरजू, आपत्तीग्रस्तांना नेहमीच मदतीचा आधार दिला जातो. गोरगरीब रुग्णांना वैद्यकीय मदतही केली आहे. दरम्यान, श्रीमती खुळे यांना संस्थेतर्फे १५ हजार रुपये देण्यात आले. आपत्तीच्या काळात त्यांना आधार दिला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, संचालक महेश मजती, डॉ. दत्ता पाटील, मीना रिंगणे, उमा तोरगल्ली, ॲड. संदीप कागवाडे यांनी श्रीमती खुळे यांच्याकडे ही मदत सुपूर्द केली.

Kolhapur, Gadhinglaj-Today
08/04/2021 Page No. 4

पुढारी

## संक्षिप्त



**भादवण : 'खळनाथ'तर्फे कंबुबाई खुळे यांना १५ हजारांची मदत देताना संचालिका मीना रिंगणे, उमा तोरगल्ली, संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले, संचालक प्रा. डॉ. दत्ता पाटील, महेश मजती, अॅड. संदीप कागवाडे आदी.**

# 'रवळनाथ'कडून भादवण येथील जळीतग्रस्तास १५ हजारांची मदत

**गडहिंग्लज (पुढारी वृत्तसेवा) :** भादवण (ता. आजरा) येथील कंबुबाई खुळे यांच्या राहत्या घराला आग लागून संसारोपयोगी साहित्यासह मोठे नुकसान झाले आहे. या घटनेने कंबुबाई खुळे या आर्थिक अडचणीत सापडल्या आहेत. ही बातमी समजताच येथील रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीचे संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले, संचालक महेश मजती, प्रा. डॉ. दत्ता पाटील, मीना रिंगणे, उमा तोरगल्ली यांनी तातडीने भादवण येथे धाव घेऊन कंबुबाई खुळे यांची विचारपूस करून त्यांना घर उभारणीसाठी १५ हजार रुपयांची आर्थिक मदत देऊन मानसिक आधार दिला. यावेळी संचालक प्रा. डॉ. दत्ता पाटील, महेश मजती, मीना रिंगणे, उमा तोरगल्ली, अॅड. संदीप कागवाडे, ग्रामस्थ उपस्थित होते.

My Kolhapur Edition
Apr 8, 2021 Page No. 8
newspaper.pudhari.co.in